# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

**प्रेसनोट क्र.१३ दिनांक ०६/०२/२०२१**

## Leading Sea Man श्री. सुरजकुमार मिथिलेश दुबे यांच्या हत्येबाबत.

फिर्यादी श्री. सुरजकुमार मिथिलेश दुबे, वय वर्षे-२७ नोकरी- इंडीयन नेव्ही, रा. रांची, राज्य- झारखंड, यांनी फिर्याद दिली की, ते इंडीयन नेव्हीमध्ये लिडींग सी मॅन या पदावर काम करत होते. दि. ३०/०१/२०२१ रोजी सुट्टी संपवून ते रांची येथुन सकाळी ०८-०० वाजता विमानाने बसून रात्री २१-०० वा. चेन्नई विमानतळावर पोहचले. विमानतळाच्या बाहेर आल्यावर ३ अज्ञात आरोपी यांनी फिर्यादी यांना रिवॉल्व्हरचा धाक दाखविला व फिर्यादी कडील ५ हजार रुपये किमतीचा मोबाईल जबरीने चोरुन घेतला. त्यांना सफेद रंगाच्या एस.यु.व्ही. गाडी मध्ये बसवून त्यांचे अपहरण करुन त्यांच्याकडे १० लाख रुपये खंडणीची मागणी केली व त्यांना ३ दिवस चेन्नई येथे कोंडून ठेवले. दि.०५/०२/२०२१ रोजी सकाळी ०९.०० वाजण्याचे सुमारास त्यांना वेवजी वैजलपाडा, घोलवड, ता. डहाणू, जिल्हा पालघर येथील डोंगरावर नेले व त्यांच्या अंगावर पेट्रोल ओतून जाळून जिवेठार मारण्याचा प्रयत्न केला असून फिर्यादी यांचा उपचारादरम्यान मृत्यू झालेला आहे. म्हणून घोलवड पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ०६/२०२१ कलम ३०२, ३०७, ३६४(अ), ३९२, ३४२, ३४ भारतीय हत्यार अधि. ३, २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास श्री. धनाजी नलावडे, उप विभागीय पोलीस अधिकारी, डहाणू उप विभाग हे करीत आहेत.

Scanned with CamScanner